गोदातीर

गुरूवार, दि. १४ ऑगस्ट २०२५

# नांदेड परिक्षेत्रातील पोलीस ठाण्यांच्या मूल्यमापनात सोनखेड पोलीस ठाणे सलग चौथ्यांना अव्वल

**नांदेड (प्रतिनिधी)**- नांदेड परिक्षेत्रातील (९१) पोलीस ठाण्यांचे पोलीस कामकाजाशी संबंधित विषयांवर दर महिन्यास परीक्षण करून त्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे देण्याची योजना नांदेड परिक्षेत्रात मागील नोव्हेंबर महिन्यापासून सुरु करण्यात आली आहे.

गुन्हे निर्गती, गुन्हे उघडकीस आणण्याचे व मालमत्ता हस्तगत करण्याचे प्रमाण, अर्ज चौकशी, चारित्र्य पडताळणी, पासपोर्ट, समन्स व वॉरंट बजावणी, फरारी व पाहिजे असलेले आरोपी अटक करणे, प्रतिबंधक कार्यवाही, दोषसिध्दी, सीसीटीएनएस, अभिलेख अद्ययावतीकरण, अवैध व्यवसाय विरोधी कारवाई इत्यादींबाबत प्रत्येक पोलीस स्टेशनने केलेल्या कामगिरीचे



दरमहा परीक्षण करण्यात येते. उपरोक्त महत्वाच्या विषयात सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पहिल्या तीन पोलीस ठाण्यांना प्रत्येक महिन्यास अनुक्रमे ५,०००, ३,००० व २,००० रुपयांचे बक्षीस व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येते. नांदेड परिक्षेत्रातील पोलीस ठाण्यांच्या एप्रिल ते जुलै दरम्यानच्या परीक्षणात, नांदेड जिल्ह्यातील सोनखेड पोलीस ठाण्याने लागोपाठ चौथ्यांदा परिक्षेत्रात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. यामुळे सोनखेड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने यांचा पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी प्रशस्तीपत्र व १० हजार रुपयांचे बक्षीस देऊन सन्मान केला आहे. त्यांच्या यशात अर्थातच त्यांच्या सहकारी अधिकारी व अंमलदारांचा मोलाचा वाटा असल्याने त्यांचे देखील अभिनंदन करण्यात आले आहे.